जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 06-02-2020

तरुण भारत

# 'गीत-बहार'ने प्रेक्षकांची मने जिंकली

## दिव्यांग पृथ्वीराजच्या 'सूर निरागस हो' गाण्यावर प्रेक्षकांकडून कौतुकाचा वर्षाव

प्रतिनिधी
कोल्हापूर

'गीत-बहार' या विद्यार्थ्यांच्या सांगितिक बहारदार कार्यक्रमांने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात 'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटातील 'सूर निरागस हो...' गीताने झाली. सिद्धराज पाटील या दिव्यांग (अंध) विद्यार्थ्याने या गीताचे सादरीकरण केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह मान्यवरांनी गीत संपताच व्यासपीठावर जाऊन पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले.

अधीर मन झाले.., जीव रंगला.., मोह मोह के धागे, मला वेड लागले प्रेमाचे, नैनो में बदरा छाए, पहला नशा, डिपाडी डिपांग, एकवीरेची पाहात होते वाट, रश्के कमर अशी गीते विद्यार्थ्यांनी सादर केली. या गायक विद्यार्थ्यांत सिद्धराज पाटीलसह गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हांडे, रोहित कांबळे यांचा समावेश होता.



कोल्हापूर : सिद्धराजच्या सादरीकरणानंतर अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. नमिता खोत, व्ही. टी. पाटील आदी.

त्यांना अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कायंदे यांनी संगीतसाथ केली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले. या कार्यक्रमानंतर विभागाच्याच विद्यार्थ्यांनी 'शिरियल फिरियल' ही पार्सिकल लघुनाटिका सादर केली. याला देखील प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनोद ठाकूर-देसाई आणि निखील भगत यांनी आयोजन केले.

### सच्च्या गुणवत्तेला मर्यादा नसतात...

'सच्च्या गुणवत्तेला कोणत्याही मर्यादा नसतात. शारिरीक अगर अन्य कोणतेही व्यंग तुमच्या अभिव्यक्तीमधील अडथळा ठरू शकत नाही, जर तुम्ही ठरवले तर ते तुम्ही करु शकता हे सिद्धराजने खऱ्या अर्थाने सिद्ध केले आहे, असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले.

# ५६ वर्षांत विद्यापीठाचे १२ लाख पदवीधर

## शिवाजी विद्यापीठाचा देशभर लौकिक : शैक्षणिक दर्जा टिकविण्यात यशस्वी

**कोल्हापूर : सचिन टिपकुर्ले**

गेल्या ५६ वर्षांपासून ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शिवाजी विद्यापीठातून आजपर्यंत १२ लाख २२ हजार २०३ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या आहेत. पदवी घेतलेल्या स्नातकांनी जीवनात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत केली. राज्य, राष्ट्रीय व जागतिक पातळीवर विविध क्षेत्रांत यश मिळवले असून, आजही ते माझं विद्यापीठ 'शिवाजी विद्यापीठ' आहे, असे अभिमानाने सांगतात.

१८ नोव्हेंबर १९६२ हा दिवस कोल्हापूरकरांच्या सदैव स्मरणात राहणार आहे. शिक्षणाच्या क्षेत्रात ज्ञानदानाचे काम करण्यासाठी या दिवशी शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. देशाचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते विद्यापीठाच्या कोनशिलेचे उद्घाटन झाले. विद्यापीठाची स्थापना कोठे करावी यावरून त्या काळात बरीच चर्चा झाली. देशाचे तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण व बाळासाहेब देसाई यांनी कोल्हापुरात विद्यापीठ स्थापनेचा निर्णय घेतला आणि नावही निश्चित केले, ते शिवाजी विद्यापीठ.

विद्यापीठाची स्थापना जरी १९६२ साली झाली असली तरी पहिल्या पदवीदान समारंभाचा दिवस उजाडला तो ६ ऑक्टोबर १९६४. यावेळी विद्यापीठाची स्वत:ची अशी इमारत नव्हती. सध्याच्या ओपल हॉटेलच्या जुन्या इमारतीत विद्यापीठाचा पहिला पदवीदान सोहळा झाला. पहिल्या पदवीदान समारंभास संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. शेजारी कुलगुरू डॉ.अप्पासाहेब पवार व विविध विभागांचे अधिष्ठाता दिसत आहेत.**



पहिल्या पदवीदान समारंभास १०८४ जणांना पदवीप्रमाणपत्र करण्यात आल्या. ६९३ स्नातकांनी प्रत्यक्ष या समारंभाला उपस्थित राहून पदवी स्वीकारली.


विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त सोहळा संपन्न होत असताना पूर्वीचा सोहळा व आताचा सोहळा यात कमालीचा फरक पडला आहे. अर्थात, बदलत्या तंत्राप्रमाणे या सोहळ्यालाही वेगळे स्वरुप प्राप्त झाले आहे. यापूर्वी तत्कालीन कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी विद्यापीठात काम करण्यासाठी अनेकांना बोलवले. ज्यांचे शिक्षण चांगले व ज्यांचे शिक्षण जेमतेम झाले अशांची ते वर्गवारी करून कामाची विभागणी करत असत. आज आधुनिक पद्धतीने पदवी प्रमाणपत्रे तयार केली जात आहेत; पण पूर्वी हाताने विद्यार्थ्यांची नावे टाकून पदवी वितरण केले जात होते. यासाठी ज्याचे हस्ताक्षर चांगले अशांची वेगळी समिती तयार केली जात होती. यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर भत्ता दिला जात होता. पदवीदान सोहळ्यासाठी जे गाऊन वापरले जायचे ते समारंभापूर्वी एक महिना स्वच्छ धुवून इस्त्री करून ठेवले जात होते. पदवीदान समारंभासाठी नंतर भव्य मंडप बांधला जाऊ लागला. लाऊड स्पीकर जोडण्यापासून लायटिंगच्या माळा लावण्यापर्यंतची लगबग अनेकांनी अनुभवली आहे.

१९६४ ते १९७० या काळात शिक्षणाचे महत्त्व वाढून पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागली. यानंतर प्रत्येक वर्षी १५ ते २० हजारांवर विद्यार्थी पदवीप्रमाणपत्र मिळवू लागले. केवळ पारंपरिक शिक्षणावर भर न देता विद्यापीठाने अन्य विभाग सुरू करून शिक्षणाची दारे विस्तारली. यातून पुढे पीएच.डी. करणाऱ्यांचे प्रमाण वाढले. आज पदवी घेणाऱ्या स्नातकांची संख्या ६० हजारांवर झाली आहे. यातूनच विद्यापीठाचा नावलौकिक समजून येतो.

'लोकल टू ग्लोबल' ही संकल्पना स्वीकारत शिवाजी विद्यापीठाने आपल्या तंत्रज्ञानात अमूलाग्र बदल केला. स्पर्धेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांना परिपूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने अनेक बदल केले. केवळ पारंपरिक विद्यापीठ नाही तर अभिमत विद्यापीठांबरोबर स्पर्धा करताना शिक्षणाचा दर्जाही टिकवून ठेवण्यात यश मिळवले आहे.

### चव्हाण यांचे भाषण आजही स्मरणात

आपल्या भाषणात यशवंतराव चव्हाण यांनी ते अमृत कुठे आहे? समुद्र मंथन करून जे अमृत निघाले ते देव प्राशन करून बसले. आता आमच्यासाठी अमृत नाही. म्हणून शिवाजी विद्यापीठाने घोषणा केली की 'ज्ञानमेवामृतम.' देव व दानवांच्या संघर्षामध्ये विषाची आणि अमृताची वाटणी होऊन ते संपून गेलेले आहे. आता ज्ञान हेच नवीन अमृत आहे असे सांगताच उपस्थितांनी टाळ्यांचा गजर केला होता. आजही त्या सोहळ्याचे साक्षीदार असणाऱ्या अनेकांना यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणाची आठवण होते.



भगतसिंग कोश्यारी



डॉ. भूषण पटवर्धन

# विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ आज, (गुरूवार) होत आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात सकाळी दहा वाजून ४५ मिनिटांनी दीक्षान्त समारंभास सुरुवात होणार आहे. यावेळी अभिषेक श्रीराम या विद्यार्थ्यास राष्ट्रपती सुवर्णपदक तर कीर्ती ननवरे हिला कुलपती सुवर्णपदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी ६० हजार १६७ स्नातकांना पदवी देण्यात येणार आहे. तर ३५३ संशोधक पीएचडी पदवी घेणार आहेत.

▸▸ सविस्तर वृत्त...
कोल्हापूर टाइम्स १ व २

# संशोधकांचा वाढला टक्का

## शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ आज; ३५३ संशोधकांना होणार पदवी प्रदान

### दृष्टिक्षेपात पीएचडी धारक

| | |
|---|---|
| १४९ | विज्ञान व तंत्रज्ञान |
| २० | वाणिज्य व व्यवस्थापन |
| ११८ | मानव्यशास्त्र |
| २८ | आंतरविद्याशाखा |
| २०६५ | प्रत्यक्ष पदवी स्वीकारणारे विद्यार्थी |
| ३५६६८ | महाविद्यालयात पदवी स्वीकारणारे |
| २२४३४ | पोस्टाने पदवी स्वीकारणारे |

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठात उच्च शिक्षणानंतर संशोधनाच्या माध्यमातून विशेष तज्ज्ञ ज्ञान संपादन करण्याची संधी असलेल्या पीएचडी पदवी घेणाऱ्यांमध्ये यावर्षी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील संशोधक विद्यार्थ्यांचा टक्का वाढला आहे. यावर्षीच्या एकूण ३५३ संशोधक विद्यार्थ्यांपैकी १४९ विद्यार्थी विज्ञान व तंत्रज्ञान शाखेतील विविध अभ्यासक्रमांचे विद्यार्थी आहेत. आज, गुरुवारी होणाऱ्या दीक्षान्त समारंभात संशोधक विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात येणार आहे. विद्यापीठाचा ५६वा दीक्षान्त समारंभ आज, ६ फेब्रुवारी रोजी होत आहे. राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी व यूजीसीचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होईल. राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता अभिषेक श्रीराम, कुलपती सुवर्णपदक विजेती कीर्ती ननवरे यांच्यासह उच्चशिक्षण पदवी, पीएच. डी. पदवी संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना गौरवण्यात येणार आहे. यानिमित्ताने विद्यापीठात बुधवारी ग्रंथमहोत्सवाने दीक्षान्त कार्यक्रमाचा माहोल निर्माण झाला.

## सुवर्णपदकाचे मानकरी

### 'अभिषेक श्रीराम'ने कोरले राष्ट्रपती सुवर्णपदकावर नाव



कोल्हापुरातील शिवाजी पेठेत राहणाऱ्या अभिषेक श्रीराम याने यंदाच्या राष्ट्रपती पदकावर नाव कोरले. त्याचे शालेय शिक्षण प्रायव्हेट हायस्कूल तर महाविद्यालयीन शिक्षण न्यू कॉलेजमध्ये झाले. त्याने इंग्रजी विषयात एम. ए. केले आहे. अभिषेकचे वडील दादासाहेब हे सरूड येथील शिवशाहू विद्यालयात शिक्षक तर आई वनिता या कोडोलीच्या यशवंत एकनाथ हायस्कूलमध्ये शिक्षिका आहे.

न्यू कॉलेजचे जीएस पद यशस्वीपणे सांभाळलेल्या अभिषेकने एनएसएस व एनसीसीमध्ये उल्लेखनीय काम केले आहे. उचगाव परिसरात राहणाऱ्या पारधी समाजाच्या भाषेवर त्याने संशोधन केले असून भविष्यात, ज्या भाषा लोप पावत आहेत त्या जतन करण्यासाठी संशोधन करण्याची त्याची इच्छा आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या मनात असलेली इंग्रजी भाषेविषयीची भीती, इंग्रजीची तयारी करण्याची त्यांची पद्धत याचा तो सध्या संशोधनात्मक अभ्यास करत आहे. विद्यार्थीदशेतील समस्या, त्याची कारणे व उपाय याविषयावर त्याने टीनएज ब्ल्यू या माध्यमातून काम केले आहे. वाचन, पाककला व डायरी लेखन हे त्याचे छंद असून भाषेचा प्राध्यापक म्हणून त्याला करिअर करायचे आहे.

### कीर्ती ननवरेला कुलपतींचे सुवर्णपदक



साताऱ्यातील शेतकरी कुटुंबातील किर्ती ननवरे ही सर्व भाषांतर्गत संस्कृत विषयात विद्यापीठात प्रथम येत कुलपती सुवर्णपदकाची मानकरी ठरली. अत्यंत सामान्य कुटुंबातील किर्तीने उच्चशिक्षणासाठी संस्कृत या विषयाच्या अभ्यासाची निवड करून भाषा व इतिहास यांची नाळ जोडून ठेवण्याचा ध्यास घेतला आहे. इतिहासातील ज्या प्राचीन गोष्टी आहेत त्यांची उकल होण्यासाठी संस्कृत भाषा हा दुवा ठरत असल्याने या भाषेच्या संशोधनासाठी ती काम करत आहे. सातारा येथील आण्णासाहेब कल्याणी विद्यालयात किर्तीचे शालेय शिक्षण झाले असून शिवाजी कॉलेजमधून तिने संस्कृत विषयातून एम. ए. पूर्ण केले आहे. तिला वाचनाचा छंद असून संस्कृत विषयात अध्यापनामध्ये तिला करिअर करायचे आहे. किर्तीचे वडील दत्तात्रय शेती करतात तर आई गृहिणी आहे.

## वर्षभरात विद्यापीठाची यशस्वी घोडदौड

विद्यापीठाने गेल्या वर्षभरात संशोधन, पेटंट, उत्कृष्ट अधिविभाग, नवे प्रयोग, सामंजस्य करार यांमध्ये देश व राज्य पातळीवर अग्रणी स्थान निर्माण केले आहे. काळानुरूप आवश्यक गोष्टींचा अवलंब करत सायबर सिक्युरिटी, इन्क्युबेशन सेंटर, कौशल्य विकास, स्टार्टअप यांसारख्या विषयात स्थान अव्वल ठेवण्यातही बाजी मारली आहे. जागतिक स्तरावर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डायझेशन' (आयएसओ) संस्थेकडून विद्यापीठाला सर्वंकष शैक्षणिक गुणवत्तेसाठी आयएसओ-९००१:२०१५ मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रातील आगेकूच कायम राखताना देशातील आघाडीच्या ७० संशोधन संस्थांच्या यादीत १९वे, तर अकृषक विद्यापीठांत देशात सहावे स्थान प्राप्त केले आहे. विशेष म्हणजे मटेरियल सायन्सच्या संशोधनात आघाडीच्या २५ संस्थांत चौथे, तर अकृषी विद्यापीठांत अग्रस्थान प्राप्त केले आहे. फॉर्चुनकोट आणि कझनकॅटसॉल या कंपन्यांसमवेत यंदा विद्यापीठाने करार करून इंधन या विषयावरील संशोधनात भर घातली आहे. भाभा अणू संशोधन केंद्राच्या 'आयर्मोन' सुविधेची प्रस्थापना हा विद्यापीठाच्या शिरपेचात एक मानाचा तुरा असून त्यामुळे संशोधक शिक्षक व विद्यार्थ्यांना संशोधनाचे नवे दालन खुले झाले आहे. चित्रपटसृष्टीला विविध २८ प्रकारच्या कलाकौशल्यांची गरज असते. या कलाप्रकारांत कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळाला संधी देण्यासाठी एनडी स्टुडिओ आर्ट वर्ल्डसोबतचा करारही महत्त्वपूर्ण आहे. तमिळ विद्यापीठ आणि सरस्वती महाल ग्रंथालयांसमवेत तंजावर पेपर्स आणि तंजावरी मराठी भाषा अभ्याससंदर्भात सामंजस्य करार केला आहे.



## मुलींची बाजी अभिमानास्पद : कुलगुरू डॉ. शिंदे




विद्यापीठातून गेल्या तीन वर्षांत उच्च पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचा वाढता टक्का अत्यंत समाधान व आनंद देणारा आहे. समाजात आज मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना मुलींनी शिक्षणाने समृद्ध होत आत्मविश्वास व आर्थिक स्वावलंबन यामध्ये निपुण व्हावे या अपेक्षापूर्तीचे द्योतक आहे. यंदाही ३२ हजारांवर मुली उच्च पदवीधर झाल्या असून ही संख्या मुलांच्या तुलनेत जास्त आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच पदवी घेणाऱ्या मुलांची संख्या सर्वाधिक अर्थात ६० हजार १६७ आहे. ही संख्या विक्रमी असून उच्च पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये होणारी वाढ तसेच संशोधनाकडे वळण्याचा कल यातून देशाच्या भविष्यात उच्चशिक्षित तरूणाईला अनेक संधी मिळणार आहेत. गेल्या ५६ वर्षांत विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, सामाजिक शास्त्रे, कौशल्य विकास व आंतरविद्याशाखा या विभागांतील उच्च पदवीधर व संशोधक विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण देऊन विद्यापीठ थांबले नसून त्यांच्यासाठी रोजगाराच्या संधी, व्यवसाय कुशल प्रशिक्षण, कार्यशाळा, संशोधनासाठी पाठबळ देणारे व्यासपीठ अशा अनेक उपक्रमांसाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. उच्चशिक्षण पूर्ण करणे, एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यातील संशोधक होणे हा महत्त्वाचा टप्पा असतो. दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील सर्वोत्तम सन्मान करत पाठीवर कौतुकाची थाप देताना कुलगुरू म्हणून मला अतीव आनंद होत आहे.

# शिवाजी विद्यापीठाचा आज दीक्षान्त समारंभ

## भगतसिंह कोश्यारी, भूषण पटवर्धन यांची उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा



५६ वा दीक्षान्त समारंभ आज, गुरुवारी सकाळी पावणेअकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात होणार आहे. अध्यक्षस्थानी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन प्रमुख उपस्थित असणार आहेत. यावर्षी ६०,१६७ स्नातकांना पदवी प्रदान केली जाणार आहे.

विद्यापीठाच्या सर्वसाधारण कौशल्यासाठीच्या सन २०१९-२०२० चे राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता कोल्हापूरच्या अभिषेक श्रीराम याला आणि कुलपती पदक सातारा येथील कीर्ती ननवरे हिला प्रदान केले जाणार आहे. ४३ विद्यार्थिनींना पीएच. डी. पदवी आणि गुणवत्ताप्राप्त १८ विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान केली जातील. ग्रंथदिंडीचे उद्घाटन सकाळी आठ वाजता कमला कॉलेज येथे कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते होईल.

यावेळी २०६५ पदव्यांचे वितरण होईल. परीक्षा भवन परिसरात दोन सत्रांमध्ये पदवी वितरण होईल. महाविद्यालयांतील ३५,६६८ स्नातकांना 'ग्रॅज्युएशन डे' कार्यक्रमात पदवी वितरण होईल.या कार्यक्रमाचे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर लाईव्ह वेबकास्टिंग केले जाणार आहे.

'ज्ञानमेवामृतम्' हे ब्रीद प्रमाण मानून कार्यरत असलेल्या शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ आज, गुरुवारी होत आहे. त्यानिमित्त उच्चशिक्षणातील मुलींचा वाढलेला टक्का, राष्ट्रपती सुवर्णपदक आणि कुलपतीपदक विजेत्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे भविष्यातील ध्येय, विद्यापीठाची शिक्षण आणि संशोधनातील कामगिरी यांचा घेतलेला हा आढावा.



## गेल्या पाच वर्षांपासून टक्केवारीत वाढ : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील चित्र

# पदवीधरांमध्ये 'सावित्रीच्या लेकी' अव्वल

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे शिवाजी विद्यापीठ उच्चशिक्षण, संशोधनात पाऊल पुढे टाकत आहे. या वाटचालीत उच्चशिक्षित व पदवीधर होण्यामध्ये दक्षिण महाराष्ट्रातील 'सावित्रीच्या लेकी' अव्वल ठरत आहेत. विज्ञान-तंत्रज्ञान, पारंपरिक अभ्यासक्रम ते पदविका अभ्यासक्रम व पदवीधर होण्यात मुलांच्या तुलनेत मुलींचा टक्का पाच वर्षांमध्ये वाढला आहे. यंदा पदवीधर मुलींची संख्या ३२,४६६ पर्यंत पोहोचली आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन, मानव्यविद्या आणि आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमामध्ये पदवीधर होण्यात मुली आघाडीवर आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत त्या मुलांपेक्षा थोड्या मागे आहेत. एकूण पदवीधर होण्यात पाच वर्षांत त्यांनी वर्षागणिक मुलांपेक्षा आघाडी घेतली आहे. यावर्षी दीक्षान्त समारंभातील पदवीधर मुलींची संख्या ३२,४६६ व पदवीधर मुलांची संख्या २७,७०१ आहे.

शैक्षणिक शुल्कामध्ये सवलत, आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना, शिक्षणाबाबतची वाढलेली जागृती, आदींमुळे उच्चशिक्षणातील मुलींचा टक्का वाढत आहे. ते चित्र महिला शिक्षणाला बळ देणारे आहे.


## गेल्या सहा वर्षांतील पदक विजेते

**राष्ट्रपती सुवर्णपदक :** श्रेयश मोहिते, सागर चव्हाण (कोल्हापूर), प्रियांका रामचंद्र पाटील (शिराळा, सांगली), सोनाली बेकनाळकर, प्रियांका पाटील, सत्यजित पाटील (कोल्हापूर).
**कुलपतीपदक विजेते :** जयश्री बाबर (कऱ्हाड), ऋचा शिदोरे, माधवी पंडित, स्नेहल चव्हाण (सातारा), दीक्षा मोरे (वाई), साक्षी गावडे (कोल्हापूर).

### पाच वर्षांतील पदवीधर

| दीक्षान्त समारंभ | मुले | मुली |
|---|---|---|
| ५२ वा (२०१६) | २६,७७१ | २६,०८१ |
| ५३ वा (२०१७) | २४,०२३ | २५,९२८ |
| ५४ वा (२०१८) | २३,५०६ | २६,९३८ |
| ५५ वा (२०१९) | २२,३८९ | २६,१२६ |
| ५६ वा (२०२०) | २७,७०१ | ३२,४६६ |

### विद्याशाखानिहाय आकडेवारी
(२०१९-२०)




### गेल्या बारा वर्षांतील पदवीधर

| वर्ष | एकूण |
|---|---|
| २००९ | ४८,३३१ |
| २०१० | ५०,७५४ |
| २०११ | ४६,६६७ |
| २०१२ | २५,९७२ |
| २०१३ | ३४,२३६ |
| २०१४ | ४६,०७४ |
| २०१५ | ४७,५०० |
| २०१६ | ५२,१६० |
| २०१७ | ४९,९५१ |
| २०१८ | ५०,४४४ |
| २०१९ | ४८,५१५ |
| २०२० | ६०,१६७ |



महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वाढली आहे, ही अतिशय स्वागतार्ह बाब आहे. मुलींना शिक्षणाची उपलब्धता वाढली आहे. त्यांच्या आकांक्षा वाढल्या आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून अधिक चांगला रोजगार मिळविणे, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व आत्मनिर्भर होणे, जीवनाचा स्तर उंचावणे, ही उद्दिष्टे तरुण मुली बाळगत आहेत. कितीही गरीब असले तरी पालक मुलांना शिक्षण देण्याचा प्रयत्न करताना दिसतात; परंतु दुसऱ्या बाजूला केवळ संख्या न पाहता एकूण स्त्रियांच्या संख्येतील किती मुली उच्चशिक्षण घेतात, ते पाहून त्यांची तुलना मुलांच्या प्रमाणाशी केली पाहिजे. सर्वांना दर्जेदार, नि:शुल्क शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे.

- डॉ. मेघा पानसरे, विदेशी भाषा प्रभारी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

## दृष्टिक्षेपात शिवाजी विद्यापीठ

- कार्यक्षेत्रातील जिल्हे : कोल्हापूर, सांगली, सातारा
- संलग्नित महाविद्यालयांची संख्या : २९३
- संलग्नित संशोधन संस्था : १३
- स्वायत्ततेचा दर्जा मिळालेली महाविद्यालये : १२
- विद्यापीठातील अधिविभाग : ३३
- अभ्यास व संशोधन केंद्रे : १४
- अध्यासने : १०
- एकूण विद्यार्थीसंख्या : २,५६,२४२
  - मुलांची संख्या : १,३०,९४३
  - मुलींची संख्या : १,२५,२९९
- दूरशिक्षण केंद्राद्वारे शिक्षण घेणारे एकूण विद्यार्थी : १६,६७३
  - विद्यार्थ्यांची संख्या : ७३६१
  - विद्यार्थिनींची संख्या : ९३१२
- दिव्यांग विद्यार्थ्यांची एकूण संख्या : ३२५
- विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापक : ७८३८
- विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचारी : ७१३९

## विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कामगिरी

- लोकसहभागातून निधी संकलित करून उच्च शिक्षण घेणाऱ्या आर्थिक दुर्बल गटातील विद्यार्थिनींसाठी बस पास योजना.
- विद्यापीठात प्रशिक्षित प्रशासकीय मनुष्यबळ निर्मिती व सक्षमीकरणासाठी स्वतंत्र 'अकॅडमी फॉर अकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेटर्स'ची स्थापना.
- सर्व अधिकार मंडळांच्या बैठकांचे कामकाज पूर्णत: ऑनलाइन पद्धतीने सुरू.
- 'जलयुक्त विद्यापीठ' योजनेद्वारे कॅम्पसवरील पावसाच्या पाण्याची साठवणूक करून पाण्यावरील खर्चात बचत.
- परीक्षा विभागाकडून सिक्युअर्ड रिमोट पेपर डिलिव्हरी (एस.आर.पी.डी.) या ई-मोडद्वारे चार हजारांहून अधिक प्रश्नपत्रिकांचे वितरण
- सर्व निकाल ऑनलाईन पद्धतीने जाहीर होतात.
- शिक्षक आणि संशोधक विद्यार्थी यांच्यासाठी रिसर्च सेन्सिटायझेशन ग्रँट आणि रिसर्च इनिसिएशन ग्रँट या योजना कार्यान्वित आहेत.
- विद्यापीठाने गेल्या वर्षी घेतलेल्या महारोजगार व कौशल्य मेळाव्यातून सुमारे साडेपाच हजार उमेदवारांना रोजगार प्राप्त
- ६५०० उमेदवारांना विविध कौशल्ये मोफत देण्यात आली.
- सेंटर फॉर व्ही.एल.एस.आय. डिझाईन या केंद्राच्या माध्यमातून संरक्षण खात्याला 'आय.आर.एन.एस.एस.' प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या काही अत्यंत गुंतागुंतीच्या आणि महत्त्वाच्या चिप्स बनविण्याचे काम विद्यापीठात होणार
- फॅकल्टी डेव्हलपमेंट सेंटर इन सायबर सिक्युरिटी ॲंड डाटा सायन्सेसद्वारे देशभरातील पाच हजार शिक्षकांना सायबर सिक्युरिटीचे प्रशिक्षण
- 'आय.एस.ओ.' हे आंतरराष्ट्रीय मानांकन मिळविले.



## संशोधन क्षेत्रातील पावले

- राष्ट्रीय स्तरावरील संशोधनाबाबत भारतातील विद्यापीठांचे जे मूल्यांकन झाले, त्यामध्ये विद्यापीठाचा 'एच' इंडेक्स ९२ राहिला.
- विविध अधिविभागांतील प्राध्यापकांना देशातील विविध वित्तीय शिखरसंस्थांकडून गेल्या वर्षभरात सुमारे १४ कोटी २१ लाख ७७ हजार ७२ रुपयांचा निधी मंजूर.
- 'इरॅस्मस प्लस' या उपक्रमांतर्गत युरोपियन युनियन आणि भारत यांच्यात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनासाठी संयुक्त प्रकल्प हाती.
- इन्क्युबेशन ॲंड इनोव्हेशन सेंटर कार्यान्वित.
- सेंटर फॉर नॅनो फॅब्रिक्समध्ये नॅनो तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आधुनिक कापडनिर्मितीच्या अनुषंगाने संशोधन
- युजीसीकडून संशोधनवृद्धीसाठी स्कीम फॉर डिसप्लिनरी रिसर्च फॉर इंडियाज् डेव्हलपिंग इकॉनॉमी (स्ट्राइड) योजनेसाठी डिसेंबरमध्ये निवड.

# इंग्रजीची भीती दूर करणार

## अभिषेक श्रीराम : पदकामुळे माझ्या जबाबदारीत वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इंग्रजीबद्दल मला भीती वाटत होती; पण सराव व अभ्यासामुळे ही भाषा अवगत केली. आज ती माझी आवडती भाषा बनली आहे. या भाषेला जागतिक पातळीवर महत्त्व आहे. मात्र, तिच्याबद्दल बहुतांश विद्यार्थ्यांच्या मनात भीती आहे. ती दूर करण्यासाठी इंग्रजीचा प्राध्यापक व्हायचे आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रपती सुवर्णपदक विजेता अभिषेक दादासाहेब श्रीराम याने व्यक्त केली. या पदकाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांत कार्यरत राहण्याबाबतची माझी जबाबदारी वाढल्याचे त्याने सांगितले.



### सर्वप्रथम क्षमता लक्षात घ्या

कोणत्याही क्षेत्रात करिअर करण्याचे निश्चित करण्यापूर्वी प्रत्येकाने सर्वप्रथम क्षमता लक्षात घ्याव्यात. त्यानंतर पुढील वाटचाल करावी. व्यक्तिमत्त्व विकासाला प्राधान्य द्यावे. त्यासाठी शालेय, महाविद्यालय पातळ्यांवरील उपक्रमांमध्ये सहभागी झाले पाहिजे, असे अभिषेक याने सांगितले.

त्याने सांगितले की, माझे आई-वडील शिक्षक. त्यामुळे शिक्षक म्हणून करिअर करायचे शालेय जीवनातच ठरविले. विविध उपक्रमांत सहभाग घेण्यासाठी त्यांचे पाठबळ होते. त्यामुळे अभ्यास व अन्य उपक्रमांत मागे राहिलो नाही. त्याच्या जोरावर प्रायव्हेट हायस्कूलमध्ये आदर्श ठरलो. न्यू कॉलेजमध्ये जी.एस. झालो. आज राष्ट्रपती सुवर्णपदकाला गवसणी घालता आली. मला भाषाशास्त्रामध्ये संशोधन करायचे आहे. त्यातील पहिले पाऊल म्हणून गेल्यावर्षी उचगाव येथील पारधी समाजाच्या बोलीभाषेचा अभ्यास केला आहे.

### प्रथमच ६० हजार पदवीधर



राजर्षी शाहूंच्या भूमीमध्ये आल्यानंतर त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिवाजी विद्यापीठात काम करायला सुरुवात केली. जास्तीत जास्त जणांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील एक तत्त्व आहे. त्यानुसार विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच यावर्षी ६० हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी या पदवीधर होत आहेत. त्यातील मुलींची संख्या अधिक आहे. कौशल्य, तंत्रज्ञान, संशोधन, व्यवस्थापन याचा विद्यापीठाने प्रभावीपणे वापर केल्याने रोजगार क्षमतेच्या संधी वाढल्या. त्यामुळे विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि त्याबरोबरच पदवीधरांची संख्या वाढली. कुलगुरु म्हणून ही बाब माझ्यासाठी समाधानाची आहे. शेवटी पालक म्हणून आपल्या पाल्याला रोजगारक्षम बनविणे हे एक प्राथमिक ध्येय असते. त्या ध्येयाच्यादृष्टीने वाटचाल सुरु झाल्याचे समाधान आहे.

- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

# संस्कृत भाषा सर्वदूर पोहोचविणार

## कीर्ती ननवरे : पदक हे कष्टाचे फळ

प्रगती पाटील ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** संस्कृत ही आपल्या मातीतील भाषा; पण अनेकांना तिचे मूलभूत ज्ञानही नाही. या भाषेला स्वत:ची अशी श्रीमंती आहे. ती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी या भाषेचा अभ्यास करून तिचे अध्यापन करण्याचा मनोदय कीर्ती ननवरे हिने व्यक्त केला.

रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कीर्ती दत्तात्रय ननवरे हिने कुलपती पदक मिळविले आहे. या पार्श्वभूमीवर 'लोकमत'शी बोलताना ती म्हणाली, घरातील एकुलती एक मुलगी म्हणून माझ्या अभ्यासाकडे कुटुंबीयांचे विशेष लक्ष होते; पण घरात धार्मिक वातावरण असल्यामुळे मला संस्कृत भाषेविषयी विशेष आकर्षण आहे.

संस्कृत शिकता यावे व त्यातच करिअर करता यावे, या उद्देशानेच कला शाखेकडे वळले. प्राध्यापकांनी प्रत्येक टप्प्यावर केलेले मार्गदर्शन, वाचनासाठी उपलब्ध करून दिलेली अवांतर पुस्तके यामुळे या भाषेची समृद्धता समजली आणि तिची व्याप्तीही उमजली. बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर मला संस्कृत विषयासाठी विद्यापीठाचे पदक मिळाले होते. हे पदक कष्टाचं फळ असतं आणि ते गरुडभरारी घेण्यासाठी बळ देतं.

### लहान वयापासूनच भाषेचे संस्कार हवेत



संस्कृत भाषा क्लिष्ट असून, ती समजायला आणि बोलायला कठीण आहे, असं अनेकांना वाटतं; पण लहानवयापासूनच या भाषेचे संस्कार आपल्यावर झाले तर ही भाषा सहज, सोपी आणि समृद्ध असल्याचे जाणवते. या भाषेचा अभ्यास करतानाच त्याचे अध्ययन आणि तळागाळापर्यंत ही भाषा पोहोचविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे कीर्ती हिने सांगितले.

# शिवाजी विद्यापीठाचा आज पदवीदान सोहळा

## राज्यपाल कोश्यारी अध्यक्ष, डॉ. पटवर्धन प्रमुख पाहुणे


**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षांत समारंभ गुरुवारी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सकाळी पावणेअकरा संपन्न होत आहे. या समारंभास विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती भगतसिंह कोश्यारी हे भूषवणार आहेत.

या पदवीदान समारंभात ६० हजार १६७ स्नातकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार संबंधित महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्राचे वितरण केले जाणार आहे. पदवी प्रमाणपत्र वाटपासाठी विद्यापीठात दहा स्टॉल उभारण्यात आले आहेत. या समारंभात राष्ट्रपती सुवर्णपदकाने शिवाजी विद्यापीठ इंग्रजी विभागातील **पान ४ वर**



राज्यपाल कोश्यारी



डॉ. पटवर्धन

### यंदा प्रथमच खादी पोशाख

यूजीसीच्या पत्रानुसार शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षांत समारंभापासून विद्यार्थ्यांना खादी पोशाख परिधान करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. यावेळच्या दीक्षांत समारंभात अधिकारी मंडळ, पदाधिकाऱ्यांचा पोशाख सलवार-कुर्ता व जॅकेट असा असणार आहे.

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दि. 06-02-2020
तरूण भारत

# वाचनसंस्कृती वाढीसाठी ग्रंथमहोत्सवाला भेट द्या

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानिमित्त ग्रंथप्रदर्शनास प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या ग्रंथ महोत्सवात देशभरातील अनेक मान्यवर प्रकाशकांनी सहभाग घेतला आहे. त्यांच्या स्टॉलवर अभ्यासक्रमातील अनेकविध विषयांच्या संदर्भग्रंथांसह महत्त्वाच्या अवांतर वाचनासाठीही हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथमहोत्सवातून वाचसंस्कृती वाढते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या बुकस्टॉलला भेट द्यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ५६व्या दीक्षांत समारंभाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत, केंद्राच्या वतीने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोर भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. यामध्ये सुमारे ३३ स्टॉल मांडले आहेत. ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या छायाचित्रांना कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




कोल्हापूर : ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी पुस्तकांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नमिता खोत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. विलास नांदवडेकर, गजानन पळसे, डॉ. पी. डी. राऊत.

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मॉर्केटिंग व व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळावेत आणि त्यांच्यातून उद्योजक, व्यावसायिक घडावेत, यासाठी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राने एमबीए युनिटच्या सहकार्याने 'ट्रेड फेअर स्टार्टअप-२०२०'चे आयोजन केले आहे. याअंतर्गत एकूण १० स्टॉल उभारले असून त्यातील आठ विविध खाद्यपदार्थांचे, सेंद्रिय गूळ आणि कोल्हापुरी चप्पलचा प्रत्येकी एक स्टॉल आहे. यात एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्र आणि फूड टेक्नॉलॉजीच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे.

या फेअरचे नियोजन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. नमिता खोत, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. डी. बी. सुतार, डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. मिलींद जोशी, एन. एम. आकुलवार आदी उपस्थित होते.

# वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणारा ग्रंथ महोत्सव

## -डॉ. देवानंद शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आजच्या तरुण पिढीमध्ये वाचनाचा अभाव दिसून येतो. या वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी ग्रंथ महोत्सव उपयुक्त ठरतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ महोत्सवात देशभरातील अनेक मान्यवर प्रकाशकांनी सहभाग घेतला आहे. त्यांच्या स्टॉलवर अभ्यासक्रमातील अनेकविध विषयांच्या संदर्भग्रंथांसह महत्त्वाच्या अवांतर वाचनासाठीही हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आमराईमध्ये भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या दोन दिवसीय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित दोन दिवसीय ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत परीक्षा संचालक गजानन पळसे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. नमिता खोत व अन्य मान्यवर.**

विद्यापीठातील ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांना अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलगुरूंसह सर्व मान्यवरांनी यावेळी सर्व स्टॉलधारक प्रकाशकांची भेट घेऊन स्वागत केले. यंदा ग्रंथ प्रदर्शनाचे १४ वे वर्ष आहे. प्रदर्शनात सुमारे ३३ स्टॉल मांडण्यात आले आहेत.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन व अधिकारी उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजन; 'गीतबहार'मध्ये तरुणाईचा जल्लोष

# ग्रंथमहोत्सवातून विद्यार्थ्यांना 'मार्केटिंग'चे धडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित १४ व्या ग्रंथमहोत्सवाचा बुधवारी प्रारंभ झाला. त्यामध्ये यावर्षी पहिल्यांदाच 'ट्रेड फेअर स्टार्टअप' हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्केटिंग आणि व्यवस्थापनाचे धडे देण्यासह मार्गदर्शन करण्यासाठी हा उपक्रम आयोजित केला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित 'गीतबहार' कार्यक्रमावेळी तरुणाईने जल्लोष केला.

येथील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, पी. डी. राऊत, ग्रंथपाल डॉ. नमिता खोत, आदी उपस्थित होते. या महोत्सवात विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र आणि एमबीए युनिटने 'ट्रेड फेअर स्टार्टअप' उपक्रम राबविला आहे. त्यात एकूण १० स्टॉल असून, त्यातील आठ स्टॉल हे खाद्यपदार्थांचे, तर कोल्हापुरी चप्पल आणि सेंद्रिय गुळाचा एक स्टॉल आहे. यात एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्र, फूड टेक्नॉलॉजी अधिविभागाचे ४० विद्यार्थी सहभागी झाले. उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.



नसीर अत्तार

**विद्यापीठात 'गीतबहार' कार्यक्रमात दिव्यांग विद्यार्थी सिद्धराज पाटील याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यासपीठावर जाऊन कौतुक केले. यावेळी व्ही. टी. पाटील, नमिता खोत, ए. एम. गुरव, डी. टी. शिर्के उपस्थित होते.**

ग्रंथमहोत्सवाच्या उद्घाटनानंतर बहुउद्देशीय सभागृहामध्ये 'गीतबहार' कार्यक्रम रंगला. जीव रंगला, अधीर मन झाले, मला वेड लागले प्रेमाचे, नैनों में बधरा छाये, पहला नशा, मोह मोह के धागे, डिपारी डिपाँग, मेरे रश्के कमर या गीतांनी मैफल रंगली. या गीतांच्या सादरीकरणाला टाळ्या, शिट्ट्यांची दाद आणि वन्समोअरची सादर देत उपस्थित तरुणाईने जल्लोष केला.

सिद्धराज पाटील, गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हंडे, रोहित कांबळे या विद्यार्थ्यांनी गाणी सादर केली. अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कायंदे यांनी संगीतसाथ दिली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले.

## 'सिद्धराज'ने मने जिंकली

'गीतबहार' कार्यक्रमाची सुरुवात 'सूर निरागस हो' या गीताने दिव्यांग (अंध) विद्यार्थी सिद्धराज पाटील याने केली. त्याचे सूर ऐकून कुलगुरु डॉ. शिंदे यांनी व्यासपीठावर जाऊन त्याचा सत्कार केला. शिक्षण घेण्यासह कला व्यक्त करण्यासाठी कोणत्या शारीरिक मर्यादा आड येत नाहीत, हे सिद्धराज याने सिद्ध केले आहे, असा उल्लेख करीत कुलगुरुंनी त्याचे कौतुक केले.

# वसले पुस्तकांचे गाव

## शिवाजी विद्यापीठात दीक्षान्त समारंभानिमित्त ग्रंथमहोत्सव

कोल्हापूर टाइम्स टीम

शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अवलियांच्या अनुभवाच्या पोतडीपासून वेळेच्या व्यवस्थापन तंत्राचा मंत्र देणाऱ्या आणि यशस्वी करिअर संधींची कवाडे खुली करण्यापासून ते माहितीचा खजिना उघडणाऱ्या पुस्तकांचे गाव शिवाजी विद्यापीठात बुधवारी गजबजले. विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या पूर्वदिनी आयोजित ग्रंथ महोत्सवाच्या मंडपात विद्यार्थ्यांनी ग्रंथांशी मैत्री केली.

सकाळी दहा वाजता हा ग्रंथमहोत्सव पुस्तक मांडणीतून खुला झाला. ग्रंथ महोत्सवात देशभरातील मान्यवर प्रकाशकांनी सहभाग घेतला. ३३ स्टॉलवर अभ्यासक्रमांतील अनेकविध विषयांच्या संदर्भग्रंथांसह महत्त्वाच्या अवांतर वाचनासाठीही हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्यावतीने राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आमराइंत दोन दिवसीय ग्रंथ प्रदर्शन भरले आहे. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनाचे १४ वे वर्ष आहे. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, डॉ. मिलिंद जोशी, एन. एम. आकुलवार, निवास माने उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठाच्या ५६व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी स्टॉलवरील पुस्तकांची पाहणी करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत डावीकडून प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, केंद्र संचालक डॉ. नमिता खोत, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत.

### 'ट्रेड फेअर स्टार्ट-अप-२०२०'

दीक्षान्त समारंभानिमित्त 'ट्रेड फेअर स्टार्ट-अप-२०२०' उपक्रमात विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप कल्पनांचा थिंकटँक भरला आहे. 'माइंट टू मार्केट' संकल्पनेवर आधारित कौशल्य विकासाला वाव देणारे प्रकल्प स्टॉल्सवर आहे. विद्यार्थ्यांना मार्केटिंग व व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळावेत आणि त्यांच्यातून चांगले उद्योजक-व्यावसायिक घडावेत, यासाठी गेल्यावर्षीपासून कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रामार्फत विद्यार्थ्यांसाठी काही स्टॉल घेऊन त्यांचे कौशल्य सर्वांसमोर प्रदर्शित करण्याची संधी दिली जात आहे. यंदा उपक्रमाची व्याप्ती वाढवून केंद्राने एमबीए युनीटच्या सहकार्याने ट्रेड फेअर स्टार्टअपचे आयोजन केले आहे. याअंतर्गत १० स्टॉल असून त्यातील आठ खाद्यपदार्थांचे तर सेंद्रिय गूळ आणि कोल्हापुरी चप्पलचा एक स्टॉल आहे. एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्र आणि फूड टेक्नॉलॉजीच्या ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. फेअरचे नियोजन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, डॉ. इंगवले व कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले आहे.

### अंध कलाकारांनी गाजवले 'गीत-बहार'

ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'गीत-बहार' कार्यक्रमात सिद्धराज या दिव्यांग (अंध)विद्यार्थ्यांच्या गाण्याने उपस्थितांना मनोरंजनाची पर्वणी दिली. 'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटातील 'सुर निरागस हो...' या गीताने सिद्धराजने मैफलीचा मंच स्वरांकित केला. मैफलीत 'अधीर मन झाले...' 'जीव रंगला...' 'मोह मोह के धागे,' 'मला वेड लागले प्रेमाचे,' 'नैनो में बदरा छाए,' 'पहला नशा,' 'डिपाडी डिपांग,' 'एकवीरेची पाहात होते वाट,' 'रश्के कमर' अशी एकाहून एक सरस गाणी विद्यार्थ्यांनी सादर केली. गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हांडे, रोहित कांबळे यांचा समावेश होता. त्यांना अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कायंदे यांनी संगीतसाथ केली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले. कार्यक्रमानंतर विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'शिरियल फिरियल' ही फार्सिकल लघुनाटिका सादर केली.

# किरण गुरव, मेघा पानसरे यांना राज्य वाङ्मय पुरस्कार

## व्यंकटेश जंबगी यांचाही समावेश : मराठी भाषा विभागाकडून घोषणा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लेखक किरण गुरव, डॉ. मेघा पानसरे (कोल्हापूर) आणि डॉ. व्यंकटेश जंबगी (सांगली) यांच्या पुस्तकांची 'स्वर्गीय यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार (२०१८)'साठी निवड झाली आहे. राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागाकडून बुधवारी हे पुरस्कार जाहीर करण्यात आले.

यामध्ये प्रौढ वाङ्मय कादंबरी विभागातील 'हरी नारायण आपटे पुरस्कार' हा लेखक किरण गुरव यांच्या 'जुगाड' या कादंबरीला जाहीर झाला. त्याचे प्रकाशक पुण्यातील दर्या प्रकाशन आहे. राधानगरी तालुक्यातील असणारे लेखक गुरव हे शिवाजी विद्यापीठातील विशेष कक्षामध्ये अधीक्षकपदी कार्यरत आहेत. गुरव यांचे आतापर्यंत तीन कथासंग्रह आणि एक कादंबरी प्रकाशित झाली असून, त्यांना लेखनाबद्दल विविध आठ पुरस्कार मिळाले आहेत. प्रौढ वाङ्मय अनुवादित विभागातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार कोल्हापूरच्या डॉ. मेघा पानसरे यांनी अनुवादित केलेल्या 'सोविएत रशियन कथा' या पुस्तकाला जाहीर झाला आहे. त्याचे प्रकाशक मुंबईतील लोकवाङ्मय गृह आहे. डॉ. पानसरे या शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाच्या प्रभारी प्रमखपदी कार्यरत आहेत. त्यांनी रशियन अनुवादित आणि वैचारिक (व्याख्यानमालेतील संपादित) सात पुस्तकांचे लेखन, संपादन केले आहे. या पुरस्कारांचे स्वरूप एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र असे आहे. बालवाङ्मय नाटक व एकांकिका विभागातील भा. रा. भागवत पुरस्कार डॉ. व्यंकटेश जंबगी यांच्या बालमंच : बाल एकांकिका संग्रहाने पटकावला आहे. जयसिंगपूरच्या कवितासागर पब्लिशिंग हाऊसने त्याचे प्रकाशन केले आहे. ५० हजार रुपये रोख, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. जंबगी हे निवृत्त प्राध्यापक असून, त्यांची आतापर्यंत कविता, लघुकथा, विनोदी कथासंग्रह, सहा पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



'जुगाड' या शब्दाचा उद्योगविश्वातील अर्थ 'बांधणी' किंवा 'सांधणी' असा आहे. अभियंत्यांची बेकारी आणि त्यामुळे तरुण मनावरील दाब यांनी निर्माण झालेली कडेलोटाची परिस्थिती कादंबरी अधोरेखित करते. संवेदनशील मनांसाठी अशा विपरीत परिस्थितीत टिकून राहण्याची शक्यता ही कादंबरी शोधते. हा पुरस्कार आजच्या काळातील हताश आणि बेदखल अभियंत्यांना मी अर्पण करु इच्छितो. ही कादंबरी त्यांना ऊर्जादायी ठरो.

**- किरण गुरव**



बालनाट्य पहिल्यांदाच लिहिले आणि त्याला राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर झाल्याचा खूप आनंद होत आहे. पुरस्कार मिळालेल्या या संग्रहात पालकांनी लहान मुलांना कोणत्या सवयी लावल्या पाहिजेत. 'गुड टच आणि बॅड टच' कसा ओळखावा, आदी विषयांवरील पाच एकांकिकांचा समावेश आहे.

**- डॉ. व्यंकटेश जंबगी**



'सोविएत रशियन कथा' या पुस्तकास मिळालेला हा पुरस्कार माझ्यासाठी विशेष मोलाचा आहे. सोविएत रशियन भाषेतून थेट मराठीत अनुवाद करणे हा नेहमीच आनंददायी आणि आव्हानात्मक अनुभव असतो. हे पुस्तक म्हणजे सोविएत रशियन साहित्याचा मराठी वाचकांना परिचय करुन देण्याचा गंभीर प्रयत्न आहे.

**- डॉ. मेघा पानसरे**

# गुरव, पानसरे, भोसले यांना वाङ्मय पुरस्कार

## नरेंद्र चपळगावकर, गोडबोले यांचा गौरव

म. टा. प्रतिनिधी, मुंबई


द. ता. भोसले


मेघा पानसरे


किरण गुरव

> जुगाड हा शब्द बांधणी किंवा सांधणी या अर्थाने अभिप्रेत आहे. या क्षेत्रातील बेकारीमुळे होणाऱ्या मानसिक खच्चीकरणाच्या कडेलोटाकडे ही कादंबरी लक्ष वेधते. विपरित परिस्थितीत संवेदनशीलता टिकून राहण्याचे बळ देणारी ही साहित्यकृती आहे.
>
> – किरण गुरव, लेखक

> अनुवादामुळे दोन देशातील सांस्कृतिक देवाणघेवाणीचा दुवा बनता आले. 'सोवियत रशियन कथा' हे पुस्तक मराठी वाचकांना रशियाची सफर घडवते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या नावाचा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी बहुमान आहे.
>
> – मेघा पानसरे, अनुवादक

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी मराठी भाषा विभागाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांची घोषणा बुधवारी करण्यात आली आहे. नरेंद्र चपळगावकर, मंगला गोडबोले, जयराज साळगावकर, प्राजक्त देशमुख आदी दिग्गजांसह एकूण ३५ जणांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. २०१८मध्ये निर्मिती झालेल्या किंवा प्रथम प्रकाशित झालेल्या साहित्याचा २७ फेब्रुवारी रोजी मराठी राजभाषा दिनी होणाऱ्या कार्यक्रमात हे पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहेत. पुरस्कार विजेत्यांमध्ये कादंबरीकार किरण गुरव, मेघा पानसरे आणि प्रा. डॉ. द. ता. भोसले यांचाही समावेश आहे.

प्रौढ वाङ्मय इतिहास श्रेणीमध्ये त्यांना समजून घेताना या वाङ्मयनिर्मितीसाठी नरेंद्र चपळगावकर, प्रौढ वाङ्मय राज्यशास्त्र, समाजशास्त्र श्रेणीमध्ये सती ते सरोगसी या पुस्तकासाठी मंगला गोडबोले यांना गौरवण्यात येणार आहे. प्रौढ वाङ्मय काव्य श्रेणीमध्ये कवी केशवसुत पुरस्कार रवींद्र लाखे यांना अवस्थांतराच्या कविता या पुस्तकासाठी, प्रौढ वाङ्मय ललितगद्य श्रेणीमध्ये मुक्या वेदना, बोलक्या संवेदना पुस्तकासाठी विनया जंगले यांना, अर्थशास्त्रविषयक लेखनात बिटकॉइन क्रिप्टोकरन्सी या पुस्तकासाठी जयराज साळगावकर यांना, संपादित प्रौढ वाङ्मयासाठी आशा बगे यांच्या निवडक कथा पुस्तकासाठी प्रभा गणोरकर यांना गौरवण्यात येणार आहे. अनुवादित श्रेणीमध्ये सोविएत कथांसाठी मेघा पानसरे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. प्रौढ वाङ्मय नाटक श्रेणीमध्ये अजित दळवी यांना समाजस्वास्थ्य नाटकासाठी देण्यात येणार आहे. एक लाख रुपये आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सध्याचे लोकप्रिय नाटक देवबाभळी या नाटकासाठी प्रथम नाटक श्रेणीमध्ये प्राजक्त देशमुख यांनाही गौरवण्यात येणार आहे. ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.


यासोबत कादंबरी श्रेणीसाठी किरण गुरव (जुगाड), प्रथम प्रकाशन काव्य श्रेणीसाठी राही डहाके, प्रथम प्रकाशन कादंबरी श्रेणीसाठी संग्राम गायकवाड, लघुकथा श्रेणीसाठी विलास सिंदगीकर, प्रथम प्रकाशन लघुकथा श्रेणीसाठी दिनकर कुटे, प्रथम प्रकाशन ललितगद्य श्रेणीसाठी नीलिमा क्षत्रिय, विनोदी प्रौढ वाङ्मय श्रेणीसाठी ज्युनियर ब्रह्मे (रुपेश कुडुचकर), प्रौढ वाङ्मय चरित्र श्रेणीसाठी सुनिता तांबे, आत्मचरित्रासाठी गो. तु. पाटील, समीक्षेसाठी डॉ. पराग घोंगे, प्रथम प्रकाशन समीक्षा श्रेणीसाठी दा. गो. काळे, भाषाशास्त्र श्रेणीसाठी डॉ. शामकांत मोरे, विज्ञान-तंत्रज्ञान श्रेणीसाठी डॉ. पुष्पा खरे आणि डॉ. अजित केंभावी, शेतीसंदर्भातील लेखनासाठी प्रा. डॉ. द. ता. भोसले, उपेक्षितांचे साहित्य श्रेणीसाठी प्रा. रुपाली अवचरे यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. शिक्षणशास्त्रासाठी डॉ. पुरुषोत्तम भापकर, तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र लेखनासाठी डॉ. सतीश पावडे, पर्यावरणासाठी डॉ. संदीप श्रोत्री तर प्रौढ वाङ्मय संकीर्ण श्रेणीमध्ये संजय झेंडे यांना राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

बालवाङ्मय कविता श्रेणीमध्ये गणेश घुले, नाटक व एकांकिका श्रेणीमध्ये डॉ. व्यंकटेश जंबगी, कादंबरी श्रेणीमध्ये डॉ. सुमन नवलकर, कथा, परीकथा श्रेणीमध्ये मृणाल वनारसे, सर्वसामान्य ज्ञान श्रेणीमध्ये आनंद घैसास, संकीर्ण श्रेणीत आशा केतकर यांना २७ फेब्रुवारी रोजी सन्मानित करण्यात येईल. तर सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार देऊन द. तु. पाटील यांचा गौरव करण्यात येणार आहे. एक लाख रुपये आणि ५० हजार रुपये असे पुरस्कारांचे स्वरूप आहे.

# विद्यापीठात ट्रेड फेअर स्टार्टअपला प्रतिसाद

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रामार्फत एमबीए युनिटच्या सहकार्याने 'ट्रेड फेअर स्टार्टअप-२०२०'चे आयोजन करण्यात आले. याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्केटिंग व व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळावेत आणि त्यांच्यातून चांगले उद्योजक-व्यावसायिक घडावेत, यासाठी गतवर्षीपासून विद्यार्थ्यांसाठीही काही स्टॉल घेऊन त्यांचे कौशल्य सर्वांसमोर प्रदर्शित करण्याची संधी देण्यास सुरुवात करण्यात आली.

यावर्षीही या उपक्रमाची व्याप्ती वाढवून कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राने याअंतर्गत एकूण १० स्टॉल उभारले. यात आठ विविध खाद्यपदार्थांचे तर सेंद्रिय गूळ आणि कोल्हापुरी चप्पलचा प्रत्येकी एक स्टॉल आहेत. यामध्ये एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्र आणि फूड टेक्नॉलॉजीच्या सुमारे ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. या फेअरचे नियोजन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, श्रीमती डॉ. इंगवले व कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले आहे.



# विद्यापीठाचा आज पदवीदान सोहळा

(पान ३ वरून)

अभिषेक श्रीराम याला तर कुलपती पदकाने सातारा येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या कीर्ती ननवरे हिला सन्मानित करण्यात येणार आहे. या समारंभाला उपस्थित राहण्यासाठी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे सकाळी दहा वाजता कोल्हापूर विमानतळावर हेलिकॉप्टरने आगमन होणार आहे. तेथून अंबाबाईचे दर्शन घेऊन ते शिवाजी विद्यापीठाच्या पदवीदान समारंभास उपस्थित राहणार आहेत.

गुरुवार, दि. ६ रोजी सकाळी साडेसात वाजता कमला महाविद्यालय येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे. या ग्रंथदिंडीला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी एनसीसी, एनएसएसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

दीक्षांत समारंभामुळे अधिविभाग व प्रशासकीय कार्यालयाची वेळ सकाळी ७.३० ते ३ अशी राहणार आहे.

## केएमटीची विशेष बससेवा...

दीक्षांत समारंभासाठी केएमटी उपक्रमामार्फत विशेष बससेवा असणार आहे. शुगर मिल व शिवाजी चौक येथून नियमित बसेस सकाळी ६.३० वाजल्यापासून सुरू राहतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दि. 06-02-2020

पुण्यनगरी

# विद्यापीठात ग्रंथ महोत्सवास सुरुवात

## हजारो पुस्तकांची मांदियाळी देशभरातील मान्यवर प्रकाशकांचा सहभाग

**कोल्हापूर / प्रतिनिधी:**

**शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ महोत्सवात देशभरातील अनेक मान्यवर प्रकाशकांनी सहभाग घेतला आहे. त्यांच्या स्टॉलवर अभ्यासक्रमातील अनेकविध विषयांच्या संदर्भग्रंथांसह महत्त्वाच्या अवांतर वाचनासाठीही हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.**

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील आमराईमध्ये भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या दोनदिवसीय प्रदर्शनाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यंदा ग्रंथ प्रदर्शनाचे १४ वे वर्ष आहे. प्रदर्शनात सुमारे ३३ स्टॉल मांडण्यात आले आहेत.

कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठाच्या क्रमांक १ च्या स्टॉलचे फीत कापून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या छायाचित्रांना कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनही करण्यात आले. कुलगुरूंसह सर्व मान्यवरांनी यावेळी सर्व स्टॉलधारक प्रकाशक व अन्य सहभागींची सदिच्छा भेट घेऊन त्यांना विद्यापीठाची दैनंदिनी भेट देऊन स्वागत केले.



कोल्हापूर: शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत परीक्षा संचालक गजानन पळसे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आदी. (सर्व छाया : पांडुरंग पाटील)

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, इंटरनेट विभागाचे समन्वयक डॉ. मिलिंद जोशी, परीक्षा विभागाचे उपकुलसचिव एन. एम. आकुलवार, सहाय्यक कुलसचिव निवास माने यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'गीत-बहार'ला जल्लोषी प्रतिसाद

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने ग्रंथ महोत्सवाच्या उद्घाटनानंतर 'गीत-बहार' या विद्यार्थ्यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. अत्यंत बहारदार झालेल्या आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या प्रतिसादाने उत्तरोत्तर रंगतदार होत गेलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरवात 'कट्यार काळजात घुसली' या चित्रपटातील 'सूर निरागस हो...' या गीताने झाली. सिद्धराज या दिव्यांग ( अंध) विद्यार्थ्याने ही सुरुवातच इतकी खणखणीत केली की, कुलगुरू डॉ. शिंदे यांच्यासह मान्यवरांनी गीत संपताच व्यासपीठावर जाऊन पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले.

'सच्च्या गुणवत्तेला कोणत्याही मर्यादा नसतात. शारीरिक अगर अन्य कोणतेही व्यंग तुमच्या अभिव्यक्तीमधील अडथळा ठरू शकत नाही, हे सिद्धराजने खऱ्या अर्थाने सिद्ध केले आहे,' असे कौतुकोद्गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले. त्यानंतर कार्यक्रमात अधीर मन झाले.., जीव रंगला.., मोह मोह के धागें, मला वेड लागले प्रेमाचे, नैनो में बदरा छाए, पहला नशा, डिपाडी डिपांग, एकवीरेची पाहात होते वाट, रश्के कमर अशी एकाहून एक सरस गीते विद्यार्थ्यांनी सादर केली. या गायक विद्यार्थ्यांत सिद्धराज पाटील याच्यासह गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हांडे, रोहित कांबळे यांचा समावेश होता. त्यांना अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कायंदे यांनी अतिशय उत्कृष्ट संगीतसाथ केली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले. या कार्यक्रमानंतर विभागाच्याच विद्यार्थ्यांनी 'शिरियल फिरियल' ही पार्सिकल लघुनाटिका सादर केली. तिलाही विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनोद ठाकूर देसाई आणि निखिल भगत यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.



कोल्हापूर: सिद्धराज या दिव्यांग (अंध) विद्यार्थ्याच्या सादरीकरणाने भारावलेल्या कुलगुरुंनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

## 'ट्रेड फेअर स्टार्टअप-२०२०'

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मार्केटिंग व व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळावेत आणि त्यांच्यातून चांगले उद्योजक-व्यावसायिक घडावेत, यासाठी गतवर्षीपासून विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रामार्फत विद्यार्थ्यांसाठीही काही स्टॉल घेऊन त्यांचे कौशल्य सर्वांसमोर प्रदर्शित करण्याची संधी देण्यात आली.

यंदाही या उपक्रमाची व्याप्ती वाढवून कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राने एमबीए युनिटच्या सहकार्याने 'ट्रेड फेअर स्टार्टअप-२०२०'चे आयोजन केले आहे. याअंतर्गत एकूण १० स्टॉल घेण्यात आले असून त्यातील आठ विविध खाद्यपदार्थांचे, तर सेंद्रिय गूळ आणि कोल्हापुरी चपलाचा प्रत्येकी एक स्टॉल आहे. यात एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्रआणि फूड टेक्नॉलॉजीच्या सुमारे ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. या फेअरचे नियोजन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, श्रीमती डॉ. इंगवले व कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले आहे.



# मेघा पानसरे, किरण गुरव यांना यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्काराची घोषणा करण्यात आली.

यामध्ये मेघा पानसरे यांनी अनुवाद केलेल्या 'सोव्हिएत रशियन कथा' या पुस्तकाला एक लाख रुपयांचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे अधीक्षक किरण गुरव यांच्या 'जुगाड' कादंबरीलाही एक लाख रुपयांचा 'हरी नारायण आपटे' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



मेघा पानसरे



किरण गुरव

उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठी देण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कारासाठी ३५ जणांची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये गो. तु. पाटील, मंगला गोडबोले, डॉ. पुष्पा खरे, डॉ. द. ता. भोसले, डॉ. संदीप श्रोती, प्रभा गणोरकर, आनंद घैसास, द. तु. पाटील आदींचाही समावेश आहे.

# ‘गीत-बहार’ वेळी तरुणाईचा जल्लोष

## शिवाजी विद्यापीठ दीक्षान्त समारंभानिमित्त संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गीत-संगीताच्या तालावर बेभान नृत्य करत शिवाजी विद्यापीठातील तरुणाईने एकच जल्लोष केला. निमित्त होते. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने आयोजित ‘गीत-बहार’ या विद्यार्थ्यांच्या सांगितिक कार्यक्रमाचे!

‘अधीर मन झाले..’, ‘जीव रंगला..’, ‘मोह मोह के धागे’, ‘मला वेड लागले प्रेमाचे’, ‘नैनो में बदरा छाए’, ‘पहला नशा’, ‘डिपाडी डिपांग’, ‘एकवीरेची पाहात होते वाट’, ‘मेरे रश्के कमर’



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ महोत्सवाच्या उद्‌घाटनप्रसंगी संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे आयोजित ‘गीत-बहार’ या कार्यक्रमात सिद्धराज या अंध विद्यार्थ्याच्या सादरीकरणाने भारावलेल्या कुलगुरूंसह सर्व मान्यवरांनी व्यासपीठावर जाऊन पुष्पगुच्छ देऊन त्याचे अभिनंदन केले. (छाया : तय्यब अली)**

अशी एकाहून एक सरस गीते सादर करून विद्यार्थ्यांनी उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमाची सुरुवात ‘कट्यार काळजात घुसली’ या चित्रपटातील ‘सूर निरागस हो...’ या गीताने झाली. सिद्धराज या अंध विद्यार्थ्याने ही सुरुवातच इतकी खणखणीत केली, की उपस्थितही भारावून गेले.

त्यानंतर सिद्धराज पाटील याच्यासह गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हांडे, रोहित कांबळे यांनी गीते सादर केली. त्यांना अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कायंदे यांनी अतिशय उत्कृष्ट संगीतसाथ केली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले. या कार्यक्रमानंतर विभागाच्याच विद्यार्थ्यांनी ‘शिरियल फिरियल’ ही फार्सिकल लघुनाटिका सादर केली. तिलाही विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनोद ठाकूरदेसाई आणि निखील भगत यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी गुणवत्तेला मर्यादा नसतात. शारीरिक अगर अन्य कोणतेही व्यंग तुमच्या अभिव्यक्तीमधील अडथळा ठरू शकत नाही, हे सिद्धराजने खऱ्या अर्थाने सिद्ध केले आहे, असे गौरोवोद्‌गार काढले.

# पानसरे, गुरव यांना पुरस्कार

## ‘सोविएत रशियन कथा’, ‘जुगाड’ कादंबरीचा समावेश



मेघा पानसरे



किरण गुरव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ५ : येथील डॉ. मेघा पानसरे अनुवादित ‘सोविएत रशियन कथा’ पुस्तकाला राज्य शासनाचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार जाहीर झाला आहे. शिवाजी विद्यापीठातीलच अधीक्षक, लेखक किरण गुरव यांच्या ‘जुगाड’ कादंबरीला ह. ना. आपटे पुरस्कार जाहीर झाला आहे.

दरम्यान, प्रत्येकी एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप असून २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिनी मुंबईत पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

डॉ. पानसरे यांच्या पुस्तकात सोविएत रशियन साहित्यिकांच्या अनुवादित कथांचा समावेश असून लोकवाङ्‌मय गृह संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन मॉस्को येथे झालेल्या भाषांतरकारांच्या परिषदेत झाले आहे. प्रौढ वाङ्‌मय (अनुवादित) या विभागातून या पुस्तकाला पुरस्कार जाहीर झाला आहे. श्री. गुरव यांचे ‘राखीव सावल्यांचा खेळ’, ‘श्रीलीपी’, ‘बाळूच्या अवस्थांतराची डायरी’ हे कथासंग्रह आणि ‘जुगाड’ ही कादंबरी प्रकाशित झाली आहे. ‘जुगाड’ कादंबरीचा शिवाजी विद्यापीठाच्या ‘बीए’ आणि मुंबई विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यासक्रमात समावेश झाला आहे.

**रशियन भाषेतील साहित्य थेट मराठीत आणताना दोन्ही संस्कृतीचा दुवा बनता आले. त्याशिवाय तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या नावाचा पुरस्कार मिळणे, हा मोठा सन्मान असून त्यामुळे जबाबदारीही आणखी वाढली आहे.**
**- डॉ. मेघा पानसरे**

**‘जुगाड’ या शब्दाचा उद्योग विश्वातला अर्थ बांधणी किंवा सांधणी असा आहे. सध्याची बेकारी आणि तरूणाईवरील दबावातून निर्माण झालेल्या परिस्थितीवर कादंबरीतून भाष्य केले आहे. पुरस्काराने जबाबदारी आणखी वाढली आहे.**
**- किरण गुरव**




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर बुधवारी ग्रंथ महोत्सवाला प्रारंभ झाला. यावेळी महोत्सवाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नमिता खोत आदी. दुसऱ्या छायाचित्रात पुस्तकांची पाहणी करताना रसिक.

# ग्रंथ महोत्सवात देशभरातील प्रकाशक

## शिवाजी विद्यापीठात दीक्षान्त सोहळ्यानिमित्त आयोजन, उत्स्फूर्त प्रतिसाद ; आजही महोत्सव खुला

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या ग्रंथ महोत्सवात देशभरातील अनेक मान्यवर प्रकाशकांनी सहभाग घेतला आहे. महोत्सवातील स्टॉलवर अभ्यासक्रमातील विविध विषयांच्या संदर्भग्रंथांसह महत्त्वाच्या अवांतर वाचनासाठीही हजारो पुस्तके उपलब्ध आहेत. त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी आज येथे केले.**



शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहासमोरील ग्रंथ महोत्सवाचे आयोजन केले आहे. या दोनदिवसीय प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. शिंदे बोलत होते. यंदा ग्रंथ प्रदर्शनाचे चौदावे वर्ष आहे. प्रदर्शनात सुमारे ३३ स्टॉल मांडले आहेत.

ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन आणि बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर यांच्या छायाचित्रांना कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते अभिवादन झाले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपग्रंथपाल डॉ. डी. बी. सुतार, सहायक ग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, डॉ. एस. व्ही. थोरात, इंटरनेट विभागाचे समन्वयक डॉ. मिलिंद जोशी, परीक्षा विभागाचे उपकुलसचिव एन. एम. आकुलवार, सहायक कुलसचिव निवास माने आदी उपस्थित होते.

### ट्रेड फेअर स्टार्ट-अप

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना मार्केटिंग व व्यवस्थापनाचे प्रत्यक्ष अनुभव मिळावेत आणि त्यांच्यातून चांगले उद्योजक-व्यावसायिक घडावेत, यासाठी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे विद्यार्थ्यांसाठीही काही स्टॉल घेऊन त्यांचे कौशल्य सर्वांसमोर प्रदर्शित करण्याची संधी दिली जाते. यंदाही या उपक्रमाची व्याप्ती वाढवून कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राने एमबीए युनिटच्या सहकार्याने ट्रेड फेअर स्टार्टअपचे आयोजन केले आहे. यांतर्गत एकूण १० स्टॉल घेतले असून, त्यातील आठ विविध खाद्यपदार्थांचे तर सेंद्रिय गूळ आणि कोल्हापुरी चपलेचा प्रत्येकी एक स्टॉल आहे. यात एमबीए, कॉमर्स, रसायनशास्त्र आणि फूड टेक्नॉलॉजीच्या सुमारे ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला आहे. या फेअरचे नियोजन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, श्रीमती डॉ. इंगवले व कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण यांनी केले आहे.

## 'गीत-बहार'ला जल्लोषी प्रतिसाद

ग्रंथ महोत्सवाच्या उद्‌घाटनानंतर 'गीत-बहार' या विद्यार्थ्यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन झाले. सिद्धराज पाटील या दिव्यांग विद्यार्थ्याने साऱ्यांचीच मने जिंकली. गुणवत्तेला कोणत्याही मर्यादा नसतात. शारीरिक अगर अन्य कोणतेही व्यंग तुमच्या अभिव्यक्तीमधील अडथळा ठरू शकत नाही, हे सिद्धराजने खऱ्या अर्थाने सिद्ध केले असल्याचे गौरवोद्‌गार कुलगुरू डॉ. शिंदे यांनी काढले.

सिद्धराज पाटील यांच्यासह गीता रणवाडकर, विनायक लोहार, हर्षदा परीट, भावना हांडे, रोहित कांबळे यांचा समावेश होता. त्यांना अमित साळोखे, ओंकार गुरव, विक्रम परीट, संदेश कार्वे यांनी अतिशय उत्कृष्ट संगीतसाथ केली. आदित्य मैंदर्गीकर यांनी निवेदन केले.

या कार्यक्रमानंतर संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्याच विद्यार्थ्यांनी 'शिरियल फिरियल' ही लघुनाटिका सादर केली. विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. विनोद ठाकूर-देसाई आणि निखिल भगत यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.



'गीत बहार'कार्यक्रमात सिद्धराज पाटील आणि सहकाऱ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.



शिवाजी विद्यापीठ : दीक्षान्त समारंभापूर्वी स्वच्छता करताना विद्यार्थी व आरोग्य विभागाचे कर्मचारी. (छाया : प्रकाश पाटील)

# विद्यापीठात स्वच्छता मोहीम

कंदलगाव, ता. ५ : शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या दीक्षान्त समारंभ कार्यक्रमास राज्यपाल भगतसिंग कोश्यारी उपस्थित राहणार असल्याने परिसराची स्वच्छता करण्यात आली.

डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीचे अमोल कुलकर्णी व आरोग्य निरीक्षक सुशांत कावडे यांचा नेतृत्वाखाली मुले, मुली व आरोग्य विभाग यांची संयुक्तरित्या विशेष मोहीम राबवून शिवाजी विद्यापीठ मेन रोडची स्वच्छता करण्यात आली.

# आज ५६ वा दीक्षान्त सोहळा

## प्रा. डॉ. भूषण पटवर्धन पाहुणे; ग्रंथ दिंडीने होणार प्रारंभ



कोल्हापूर, ता. ५ : शिवाजी विद्यापीठाचा ५६ वा दीक्षान्त समारंभ उद्या (गुरुवारी) होणार आहे. सोहळ्याची तयारी पूर्ण झाली असून नवी दिल्ली येथील विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. भूषण पटवर्धन यंदाच्या दीक्षान्त सोहळ्याचे प्रमुख पाहुणे आहेत. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी पावणेअकरा वाजता मुख्य राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात सोहळ्याला प्रारंभ होईल.

विद्यापीठाच्या इतिहासात यंदाच्या सोहळ्यात सर्वाधिक साठ हजार १६७ पदवी व पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत. एकूण ३१० स्नातकांना पीएच.डी. पदवी प्रमाणपत्रे दिली जाणार असून प्रत्यक्ष व्यासपीठावर फक्त ४३ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वितरण होईल. यावेळी दोन सुवर्णपदकांसह सोळा विद्यार्थ्यांना विविध पारितोषिके दिली जातील. दरम्यान, दीक्षान्त सोहळ्यापूर्वी सकाळी साडेसातला कमला कॉलेज येथून ग्रंथ दिंडीला प्रारंभ होणार आहे.

### गजानन पळसे यांची नियुक्ती कायदेशीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालकपदाचे अधिकार दिलेल्या गजानन पळसे यांची नियुक्ती कायदेशीर व अधिकृत आहे, अशी माहिती प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर प्रभारी परीक्षा संचालकांना व्यासपीठावर स्थानापन्न होण्याचे अधिकार देऊ नयेत, अशी मागणी करणारे पत्र काही विद्यार्थी संघटनांनी प्रसिद्धीस दिले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ प्रशासनाने दुपारी बैठक घेतली आणि त्यानंतर संचालक नियुक्ती अधिकृत असल्याचे स्पष्ट केले.

### राज्यपालांचा दौरा असा...

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांचे सकाळी दहा वाजता हेलिकॉप्टरने कोल्हापूर विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर सव्वादहा वाजता अंबाबाई मंदिरात ते दर्शनासाठी येतील आणि दहा वाजून पस्तीस मिनिटांनी दीक्षान्त सोहळ्यासाठी रवाना होतील. दीक्षान्त सोहळ्यानंतर बारा वाजून २५ मिनिटांनी त्यांचे कुलपती निवास येथे आगमन होईल.